**क्रमांक : ४६**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

**पत्रक भाग-दोन**

**गुरुवार, दिनांक १५ मे, २०२५ /वैशाख २५, १९४७ (शके)**

**संदर्भ :- महाराष्ट्र विधानपरिषद पत्रक भाग- दोन क्रमांक : १४०/१४४, दिनांक १३ नोव्हेंबर, २०२३**

**महाराष्ट्र विधानपरिषदेचे मा.सदस्यांनी प्रश्न मागे घेण्याबाबत अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबतचे संदर्भाधीन पत्रक भाग- दोन अधिक्रमित करुन सुधारित पत्रक भाग- दोन वितरीत करण्यात येत आहे :-**

५५ सर्व सन्माननीय सदस्यांना निदेशानुसार कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषद नियम ८१ मध्ये प्रश्न मागे घेण्यासंदर्भात "सदस्यास, त्याचा प्रश्न बैठकीच्या ज्या दिनांकास यादीत ठेवण्यात आला असेल त्या दिनांकापूर्वीच्या दिवशी सूचना देऊन आपला प्रश्न मागे घेता येईल किंवा सूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा नंतरच्या दिवसापर्यंत तो लांबणीवर टाकता येईल" अशी तरतूद करण्यात आली आहे. या नियमातील तरतुदीनुसार मा.सदस्यांना त्यांचे प्रश्न मागे घेता येतात.

सदर नियमातील तरतुदीस अनुसरुन, मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार "यापुढे ज्या सन्माननीय सदस्यांना आपला प्रश्न मागे घ्यावयाचा असेल त्यांनी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या दालनात समक्ष येऊन सदस्यांनी त्यांच्या छापील लेटरहेड वर प्रश्न मागे घेण्याबाबतची विनंती करावी, अन्य ठिकाणी प्राप्त झालेल्या पत्राची या सचिवालयामार्फत दखल घेतली जाणार नाही."

विधान भवन, मुंबई
दिनांक : १५ मे, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव (१)
महाराष्ट्र विधानपरिषद

याची प्रत :

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.
(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
(३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(५) संगणक कक्ष (संकेतस्थळ).